1

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** भंडारा **P.S.(ठाणे):** भंडारा **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0678 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 23/10/2019 21:18 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 23/10/2019

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 23/10/2019

**Time From (वेळेपासून):** 17:30 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 23/10/2019 **Time (वेळ):** 20:59 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 046 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 23/10/2019 20:59 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 1 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय,भंडारायेथील आस्थापना कक्ष

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री. पंकज रावचंद फंदे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

# फिर्याद

दिनांकः—२३/१०/२०१९.

मी पंकज रावचंद फंदे, वय ३२ वर्षे धंदा— आईसक्रिम पार्लर व कॅफे रा. राजीव गांधी चौक भंडारा.

मी दिनांक २३/१०/२०१९ रोजी पोलीस निरीक्षक श्री. योगेश्वर पारधी ला. प्र. वि. भंडारा यांचे समक्ष लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबधाने तक्रार नोंदविली. मी नोंदविलेली तक्रार खालील प्रमाणे आहे.

''मी पत्यावर आपले कुटुंबासह राहत असुन, माझे वडील श्री. रावचंद पांडुरंग फंदे हे आरोग्य विभागात आरोग्य सहाय्यक, म्हणुन कार्यरत होते. माझे वडील आजारी राहत असल्याने त्यांनी एप्रील २०१६ मध्ये स्वेच्छानिवृत्ती घेतली सध्या माझ्या वडीलांचा अपघात झाल्यामुळे त्याचे ऑपरेशन झाले असुन ते घरीच राहतात.

माझ्या वडीलांनी सन २०१६ मध्ये स्वेच्छानिवृत्ती घेतली असुन त्यांना अदयापावेतो पेंशन लागु झालेली नाही. वडील आजारी असल्यामुळे वडीलांच्या पेंशन संबंधाने विचारपुस करण्यासाठी मी जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय भंडारा येथे जावुन आरोग्य अधिकारी, पाठक मॅडम यांना भेटलो असता त्यांनी सांगीतले की, तुझ्या वडीलांचे पेंशनचे काम लवकर होवुन जाईल. पेंशनची फाईल बोंदरे बाबु कडे आहे. त्यानंतर मी बोंदरे बाबु यांना भेटलो असता बोंदरे बाबु यांनी माझ्या वडीलांची पेंशनची फाईल नागपूर येथे पाठवावी लागेल असे सांगीतले. त्यानंतर मागील आठवडयात बोंदरे बाबु यांनी माझ्या वडीलांच्या मोबाईलवर फोन करून सांगीतले की तुमची पेंशनची फाईल लवकर नागपुर येथिल वेतन पडताळणी कार्यालयाला पाठवावी लागेल. मी तुमची फाईल वेतन पडताळणी कार्यालय नागपूर येथे पाठवुन तुमचे पेंशन प्रकरण मंजुर करूवुन देतो पण त्यासाठी तुम्ही मला ८,०००/—रूपये दया नाहीतर तुमची पेंशन प्रकरणाची फाईल मंजुर होणार नाही. तुम्हाला अजुन सहा महीने वाट पाहावी लागेल. असे म्हणुन माझ्या वडीलाला बोंदरे बाबु यांनी ८,०००/— रूपये लाचेची मागणी केली. त्या लाचमागणीबाबत त्याचवेळी मला माझ्या वडीलांने सांगीतले. मी दिनांक १६/१०/१९ रोजी बोंदरे बाबु बाबत माहीती घेतली असता ते मुंबईला गेल्याचे समजले. आज बोंदरे बाबु कार्यालयात आल्याचे समजले, त्यामुळे मी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात येवुन तोंडी तक्रार देत आहे.

माझे वडील आजारी असुन ते शारीरीक हालचाल करण्यास सध्या असमर्थ असल्याने ते तक्रार देण्यासाठी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालयात येवु शकत नाही. त्यामुळे मी श्री. बोदरे बाबु यांच्याविरूध्द तक्रार देण्यासाठी ला.प्र.वि. कार्यालया भंडारा येथे तोंडी तक्रार देत आहे. माझ्या वडीलांच्या पेंशन प्रकरणाची फाईल वेतन पडताळणी कार्यालय नागपूर येथे पाठवुन, पेंशनचे प्रकरण मंजुर करवुन देण्यासाठी मला श्री. बोंदरे बाबु यांना लाच रक्कम ८,०००/— रूपये देण्याची मुळीच इच्छा नसल्याने, मी त्यांच्या विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्याकरीता तोंडी तक्रार देत आहे.

श्री. बोंदरे, बाबु यांच्याशी पुर्वीचे माझे कोणतेही आर्थिक देवाण घेवाणीचे व्यवहार किंवा वैमनस्य नाही. तरी त्यांचे विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी.

पोलीस निरीक्षक श्री. पारधी यांनी लाचेच्या संबंधाने सापळा पडताळणी व सापळा कार्यवाही आयोजित करण्यासाठी दोन शासकीय पंचाना बोलावून घेवून त्यांना मी दिलेली तोंडी तक्रार संगणकावर टंकलिखित करून, त्यांची प्रिंट काढुण, ती वाचण्याकरीता दिली व पंचांनी



Fande
P. R. Fande 23/10/2019

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | राजीव गांधी चौक भंडारा,भंडारा,भंडारा,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | राजीव गांधी चौक भंडारा,भंडारा,भंडारा,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9767305364

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रमेश विठ्ठल बोंदरे | | | 1. आंबेडकर वार्ड, कारधा,करंधा ,भंडारा, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

प्रकरण अशा प्रकारे आहे की, नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील नमुद आरोपी यांनी आपले लोकसेवक पदाचा गैरफायदा घेवुन स्वतः चे आर्थिक लाभा करीता यातील फिर्यादी यांना पडताळणी कार्यवाही वेळी त्यांच्या वडीलांनी सन 2016 मध्ये स्वेच्छानिवृत्ती घेतल्याने, त्यांची पेंशन प्रकरणाची फाईल वेतन पडताळणी कार्यालय नागपूर येथुन मंजुर करवुन देण्याकरीता 8,000/- रू. लाचेची मागणी करून प्रत्यक्ष सापळा कार्यवाही वेळी कोणत्याही प्रकारचा प्रतिकार न करता 8,000/- रूपये स्विकारल्याने सदचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

13.**Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** sudhakar kaluram chavhan(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

त्याचेवर सहया केल्या. त्यानंतर ८०००/— रूपये सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. आणि दोन्ही पंचासमक्ष पेश केले. त्यांनी त्याचेवर पावडर लावून, एका लॅम्प चे उजेडात निळ रंगाची चकाकी दिसत असल्याचे, त्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले.

त्यानंतर पंचासमक्ष मला आणि पंचाना तक्रारीची पडताळणी करण्याकरीता सुचना दिल्या. पडताळणी करीता मी, व पंच क्र. १ श्री. विजय प्रधान यांचे सह श्री. बोदरे, बाबु यांचे कडे जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय भंडारा येथे स्वतःच्या गळयात व्हाईस रेकॉर्डर टाकुन घेवुन गेलो. ते तिथे हजर नसल्याने त्यांचे मोबाईल क्रमांक घेवुन ते हजर असलेले ठिकाण साईराज आटोमोबाईल्स, दुकानजवळ जावुन श्री. बोदरे, बाबु यांचेशी बोलणी केली असता त्यांनी **"माझ्या वडीलांनी सन २०१६ मध्ये स्वेच्छानिवृत्ती घेतल्याने, त्यांची पेंशन प्रकरणाची फाईल वेतन पडताळणी कार्यालय नागपूर येथुन मंजुर करवुन देण्याकरीता"** ८,०००/— रू. लाचेची मागणी करून लाच रक्कम काही वेळाने श्री. बोदरे बाबु यांनी त्यांचे कार्यालय जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय भंडारा येथे स्विकारण्याची तयारी दर्शविली होती. मी पंचासह परत आल्यावर अधिका—यांनी यांनी व्हाईस रेकॉर्डर मधिल संरक्षित संभाषन ऐकुण लाचेची मागणी झाली असल्याची शहानिशा केली.

सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. पारधी यांनी ला. प्र. वि. कार्यालय, भंडारा या कार्यालयातून सापळा कार्यवाही करीत असतानां माझे गळयात व्हाईस रेकॉर्डर लावून पावडर लावलेल्या ८०००/— रू. च्या नोटा ज्यात ५००/— रूपयाच्या सोळा नोटाचा समावेश होता, त्या माझ्या पॅन्टच्या उजव्या बाजुच्या खिशात पंच श्री. राजेश राऊत यांचे हस्ते ठेवुन, त्यानंतर मी बोंदरे बाबु यांचे मोबाईलवर कॉल करून ते कार्यालयात असल्याची शहानिशा करून, श्री. बोंदरे, बाबु यांचेकडे जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय भंडारा येथे पंच क्र. १ श्री. विजय प्रधान यांचेसह गेलो असता श्री. बोंदरे, बाबु हे हजर होते. त्यांनी मला मागणी केलेली लाचेची रक्कम ८,०००/— रू. श्री. बोंदरे बाबु यांनी आपले उजवे हातांनी स्विकारून आपले वापरते फुलपॅन्टचे मागील उजवे बाजुच्या खिश्यात ठेवले.

वरिलप्रमाणे लाच रक्कम श्री. बोंदरे बाबु यांनी स्विकारल्यानंतर श्री. पारधी सर यांना ठरल्याप्रमाणे ईशारा दिला. श्री. पारधी सर हे स्वतः व स्टॉफ सह त्या ठिकाणी आले. श्री. बोंदरे, बाबु यांनी लाचेची रक्कम आपले उजवे हाताने स्विकारून आपले वापरते फुलपॅन्टचे मागील उजवे बाजुच्या खिश्यात ठेवल्याने, पंच श्री. राऊत यांना ती काढुण त्यावर चमकनारी पावडर दिसत असल्याची शहानिशा निळया लाईटचा उजेड टाकुन केली आणि त्या नोटावरिल क्रमांकाची शहानिशा करून मी सादर केलेल्या त्याच नोटा असल्याची खात्री केली. ती लाच रक्कम जप्त करून ताब्यात घेतली.

श्री. बोंदरे, बाबु जिल्हा हिवताप अधिकारी कार्यालय भंडारा यांनी "माझ्या वडीलांनी सन २०१६ मध्ये स्वेच्छानिवृत्ती घेतल्याने, त्यांची पेंशन प्रकरणाची फाईल वेतन पडताळणी कार्यालय नागपूर येथुन मंजुर करवुन देण्याकरीता" ८,०००/— रू. ची लाच रक्कम आज रोजी माझेकडुन स्विकारली. ती रक्कम श्री. बोंदरे, बाबु यांचे ताब्यातुन पोलीसांनी सापळा रचून जप्त केली आहे. श्री. बोंदरे, बाबु यांनी लाचेची मागणी करून ती स्विकारल्याने त्यांचे विरूध्द कार्यवाहीस्तव: मी फियार्द देत आहे.

माझी वरिल फिर्याद प्रिंट काढुन मला वाचण्यास दिली असुन, ती माझे सांगणेप्रमाणे बरोबर संगणकावर टंकलिखीत करण्यात आली आहे. त्यावर मी सही केली.



Fande 23/10/2019
P. R. Fande

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Fande (p.R.fande)

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

SKhorkar 1076

**Name** (नाव): sudhakar kaluram chavhan

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.):

पो.ना. ठवकर/1076

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /** (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**